# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परिपत्रक क्र.१८८ / २०१७

प्रति,

मा. प्राचार्य / संचालक,

सर्व संलग्नीत स्वायत्त महाविद्यालये / मान्यताप्राप्त स्वायत्त परिसंस्था

विषय : संलग्न स्वायत्त महाविद्यालये / मान्यताप्राप्त स्वायत्त परिसंस्था यांना स्वायत्तता मिळण्यापूर्वी अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत...

संदर्भ : विद्यापरिषद क्र. अ १८/पीए/१७ दि. १३ जुलै, २०१७

विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार ''ज्या महाविद्यालयांमध्ये स्वायत्तता मिळण्यापूर्वी विद्यापीठाच्या अभ्यासक्रमास ज्या विद्यार्थ्यांनी नोंदणी केलेली होती, परंतु जे प्रथमवर्षामध्ये अनुत्तीर्ण झालेले आहेत व त्यानंतर द्वितीय वर्षास प्रवेश घेण्यास पात्र ठरलेले आहेत अशा विद्यार्थ्यांनाही त्याच महाविद्यालयात स्वायत्त अभ्यासक्रमास प्रवेश घेण्यास अनुमती देण्यात यावी. तथापि, विद्यापीठ अभ्यासक्रमास नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यास विद्यापीठाचाच अभ्यासक्रम पूर्ण करुन पदवी प्राप्त करावयाची असल्यास अशा विद्यार्थ्यांना स्थलांतर पत्र (Transfer Certificate) संबंधित महाविद्यालयाने देणे अनिवार्य आहे. तसेच मा. संचालक, तंत्र शिक्षण यांच्या अखत्यारित येत असलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमांस मा. संचालक, तंत्र शिक्षण यांच्या अनुमतीने दुस–या महाविद्यालयात प्रवेश घेण्यास स्थलांतर पत्र (Transfer Certificate) संबंधित महाविद्यालयाने देणे अनिवार्य आहे.''

उपरोक्त परिपत्रकातील आशय लक्षात घेऊन स्वायत्तता मिळालेल्या महाविद्यालये / मान्यताप्राप्त परिसंस्थांनी त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

गणेशखिंड, पुणे ४११ ००७ )
जावक क्र. : सीए/१५३० )
दिनांक : १६ ऑगस्ट, २०१७ )

१६/८/१७

उपकुलसचिव
(शैक्षणिक विभाग)